NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक ०२.११.२०२६ सोमवार

मा. न्यायालयातुन आरोपीला कारावासाची शिक्षा :–

दिनांक ०२.११.२०२६ रोजी, मा. जिल्हा अतिरिक्त सत्र न्यायाधीश–१५, नागपुर, श्रीमती एच. ए. अन्सारी मॅडम यांनी त्यांचे कोर्टाचे विशेष केस क्र. ८/२०२४ मधील, पोलीस ठाणे पारडी येथील अप. क्र. ३२९/२०२२ कलम ३०६, ३२३, ५०४, ३४ भा.दं.वि. या गुन्ह्यातील आरोपी क्र. १) धरम परमानंद सुखदान, वय २८ वर्षे, २) शैलेष परमानंद सुखदान, वय २४ वर्षे, ३) किरण परमानंद सुखदान, वय ५३ वर्षे, ४) सोनम पंकज भंवर, वय २८ वर्षे, सर्व रा. प्लॉट नं. ८६, जय अंबे नगर, भांडेवाडी, नागपूर यांचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपी क्र. १ ते ४ यांना कलम ३२३, ३४ भा.दं.वि. कायद्यान्वये १० दिवस कारावासाची शिक्षा व प्रत्येकी ५००/–रू. दंडाची शिक्षा ठोठावली.**

यातील आरोपी क्र. १ याचेसोबत सौ. नंदीनी धमर सुखदान वय २८ वर्ष हिचे लग्न झाले असल्याने त्या आरोपी क्र. १ ते ४ यांसोबत परिवारात राहत होती. लग्नाचे एक वर्षानंतर सासु–सुनेचे भांडण झाले असता, आरोपी क्र. १ ते ४ यांनी संगनमत करुन, सौ. नंदीनी हिला शारीरीक व मानसिक त्रास दिल्याने, त्यांनी कंटाळुन दिनांक ०८.०९.२०२२ चे १५.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे बेला, नागपुर ग्रामिण हद्दीत रेल्वेमधुन उडी घेऊन आत्महत्या केली होती. फिर्यादी श्रीमती सुमित्रा मांगिलाल बन्सकार, वय ५२ वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पारडी येथे आरोपींविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपींना दिनांक १९.०९.२०२२ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी पोउपनि. अमित मिश्रा यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती योगीता राऊत यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. एन. आर. कुकवास यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी पोहवा. विष्णु ठवकर व पोअ. भास्करराव देवगडे यांनी काम पाहिले.

(कामगिरी)

सिताबर्डी पोलीसांची कामगिरी :– जबरी चोरी करणाऱ्या आरोपीस अटक.

फिर्यादी रोहीत संतोष होरे वय ३२ वर्षे, रा. प्लॉट क्र. ४, प्रधान ले–आऊट, गोपालनगर, तिसरा बस स्टॉप, एनपीटीआय कॉलेज मागे, राणा प्रतापनगर, नागपुर हे दिनांक ०१.११.२०२६ चे १६.०० वा. चे सुमारास, त्यांचे मेयो हॉस्पिटल येथील अतिदक्षता विभागातील कर्तव्य पुर्ण करुन, आपले दुचाकीने पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत महाराजबाग परिसरातील आम रोडने जात, त्यांना फोन आल्याने ते फोनवर बोलत उभे होते. त्यांचे जवळ एक सावळा वर्ण, उंची अंदाजे ५ फुट ११ इंच व अंगात टि–शर्ट व काळा पॅन्ट घातलेल्या वर्णनाचा २६ वर्षीय इसमाने येऊन, फिर्यादीसोबत बोलण्याचे बहाण्याचे त्यांचे गळ्यातील ८ ग्राम वजनी सोन्याची चैन किंमती ८०,०००/–रू. ची जबरीने हिसकावुन पळुन गेला. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन, पोलीस ठाणे सिताबर्डी येथे अनोळखी आरोपीविरुध्द कलम ३०४(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासात, सिताबर्डी पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, सीसीटिव्ही फुटेजची पाहणी तसेच, गोपनिय बातमीचे आधारे आरोपीस निष्पन्न केले. सापळा रचुन आरोपी नामे आकाश उर्फ बोनीराजा बदलानी, वय २६ वर्षे, रा. प्लॉट क्र. ९६, आशिलेष अपार्टमेंट, अंबाझरी, सिताबर्डी, नागपुर यास ताब्यात घेवुन, विचारपूस केली असता, त्याने वर नमुद जबरी चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन गुन्ह्यात चोरी केलेला मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंह, पोलीस उप आयुक्त (परि क्र. २), मा. श्री. सुनिलसिंग पवार, सहा. पोलीस आयुक्त (सिताबर्डी विभाग), वपोनि. सुहास राऊत यांचे मार्गदर्शनाखाली, दुपोनि. मनिष कोल्हटकर, पोउपनि. श्याम वारंगे, पोहवा. नंदकिशोर वालदे, पोअं प्रशांत भोयर, चेतन शेंडे, नैनिश तलवारे, सचिन भोयर व मपोअं. आरती यांनी केली.



(गुन्हे)

१) पोलीस ठाणे एमआयडीसी :– फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

फिर्यादी नरेंद्र भार्गव काणे, वय ६५ वर्षे, रा. प्लॉट क्र. ५९, रामदासपेठ, श्रीराम भवन मागे, सिताबर्डी, नागपूर यांची पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत, इंडस्ट्रीएल एरीया, यु–२४ येथे ऋषि इंडस्ट्रीज नावाची प्लास्टीक कंपनी आहे. दिनांक २३.१०.२०२६ चे १६.०० वा. चे सुमारास फिर्यादी आपले कंपनीत हजर असतांना, त्यांचे मोबाईलवर एका मोबाईल क्र. ७३२१९४२२१८ चे धारकाने कॉल करुन, तो बॅक ऑफ महाराष्ट्र येथुन बोलत असल्याचे सांगुन, फिर्यादीचे पेंशन कार्ड बनत असल्याने, बॅकेमार्फतीने लिंक पाठवितो, ती ओपन करुन त्यावर पाहिजे ती माहिती भरा असे म्हटले. फिर्यादीने त्यांचे मोबाईलवर प्राप्त लिंक ओपन करुन, त्यावर माहिती पाठविले असता, फिर्यादीचे बॅक ऑफ महाराष्ट्र येथील खात्यावरुन दिनांक २३.१०.२०२६ चे १६.१९ आणि १६. २१ वा. प्रत्येकी ४,९०,०००/– रुपये असे एकुण ९,८०,०००/– रुपये कपात झाल्याचे दिसुन आले. फिर्यादी यांनी लिंक पाठविणारे इसमास फोनद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्या इसमाने आपला फोन बंद करुन ठेवल्याचे दिसल्याने, आरोपीने फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करुन त्यांची आर्थिक फसवणूक केल्याचे फिर्यादी यांना समजले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे मपोउपनि. मनिषा जाधव यांनी आरोपीविरूध्द कलम ३१८(४) भा.न्या.सं. सहकलम ६६(क) आय.टी. ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे कोराडी :– चोरीचा गुन्हा दाखल.

फिर्यादी योगराज नत्थुजी ठाकरे, वय ४० वर्षे, रा. राधाकृष्ण नगर, तारसा रोड, कन्हान, नागपूर हे पोलीस ठाणे कोराडी हद्दीत कोराडी थर्मल पावॅर २१० मेगावॅट सेक्शनचे युनिट क्र. ७ येथे साईट इंचार्ज पदावर कार्यरत आहेत. दिनांक १२.१०.२०२६ चे २२.३० वा. चे सुमारास, साईटवरील भंगार साहित्य वजनी ३५.३३० मेट्रीक टन किंमती १६,६२,६५७/–रू. चा मुद्येमाल १६ चाकी ट्रक क्र. डब्ल्यु बी २९ सी १९६५ यामध्ये लोड करुन, पंजाब येथे पोहोचविण्याकरीता चालक आरोपी नामे एस. के. अनिशुल रा. डिघासीपुरा, चक्कास्विपा, भवानीपुर, जि. मेदिनीपुर (पश्चिम बंगाल) याचे हस्ते पाठविला होता. परंतु माल वेळेत न पोहोचल्याने, ट्रक चालक आरोपीचे मोबाईलवर फिर्यादी यांनी अनेकदा संपर्क केला असता, त्याचा फोन बंद येत होता. आरोपीने पाठविलेल्या ठिकाणी माल न पोहोचविता, तो माल ट्रकचालकाने चोरुन नेला. अशा फिर्यादी यांनी दिनांक ३१.१०.२०२६ रोजी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोराडी येथे मपोउपनि. निशा गवळी ९८३४३२७९२५ यांनी आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

३) पोलीस ठाणे एमआयडीसी :– गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक ३०.१०.२०२६ चे २१.०० वा. चे सुमारास, फिर्यादी मयुर नरेश मेश्राम वय २८ वर्षे, रा. संगम रोढ, डेंटल कॉलेज, वानाडी, एमआयडीसी, नागपूर हे त्यांचे दुचाकी क्र. एम.एच. ३१ डीएच ०७६९ ने पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत, संगम रोडवरील वानाडोंगरी, नवीन पेट्रोल पंपजवळून जात असता, एका तीनचाकी ऑटोरिक्षा क्र. एमएच ४९ ए ८४८० चे चालकाने त्याचे ताब्यातील ऑटोरिक्षा भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे दुचाकीस मागुन धडक मारून पळुन गेला. अपघातामध्ये फिर्यादी हे त्यांचे दुचाकीसह खाली पडल्याने, त्यांचा उजवा पाय फ्रॅक्चर झाला. त्यांना उपचाराकरीता शालिनीताई मेघे हॉस्पीटल येथे दाखल केले आहे. उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे पोउपनि. व्यंकटेश नुलगोंडावार ७५०७१०८४२७ यांनी आरोपी ऑटोरिक्षा चालकाविरूध्द कलम २८१,१२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १८४, १३४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

(मिसींग)

१) पोलीस ठाणे जरीपटका :– फिर्यादी प्रविण राष्ट्रपाल चवरे वय ३५ वर्षे, रा. इंदोरा भंडार मोहल्ला, कोल्हटकर चे घराजवळ, जरीपटका, नागपूर यांनी पोलीस ठाण जरीपटका येथे तक्रार दिली की, त्यांची पत्नी नामे सौ. प्रतिक्षा प्रविण चवरे वय ३० वर्षे ह्या दिनांक ३१.१०.२०२६ चे ०७.०० वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरुन बेपत्ता झाल्या आहेत. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आल्या नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे जरीपटका येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **बेपत्ता व्यक्तीचे वर्णन–** रंग–सावळा, चेहरा–लांबट, बांधा–मजबुत, उंची–५ फुट ३ इंच, केस–काळे लांब, अंगात–लाल खाकी लायनिंग असलेला सलवार सुट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात. ओळखचिन्ह–डावे हातावर चिरे मारल्याचे निशान व डावे पायाचे करंगळीलगतचे दुसरे बोट लहान आहे.

२) पोलीस ठाणे जरीपटका :– फिर्यादी राजेश खेमचंद थावानी, वय ५० वर्षे, रा. प्लॉट क्र. १७८, आशिष एनएक्सचे मागे, जिंजर मॉलजवळ, जरीपटका, नागपूर यांनी पोलीस ठाण जरीपटका येथे तक्रार दिली की, त्यांचा मुलगा नामे हितेश राजेश थावानी, वय २४ वर्षे हा दिनांक ३१.१०.२०२६ चे १६.०० वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरुन बेपत्ता झाला आहे. त्याचा शोध घेतला असता, मिळून आला नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यास फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे जरीपटका येथे

अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **बेपत्ता व्यक्तीचे वर्णन–** रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–मजबुत, उंची–५ फुट १० इंच, केस–काळे लांब, अंगात– खाकी पॅन्ट व हॉफ कत्था टिशर्ट घातलेला आहे. भाषा– सिंधी/हिंदी बोलतात.



प्रतिक्षा



हितेश

(ईतर)

आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

अ	कोर्टाचे नाव	केस क्र.	कलम	आरोपीचे नाव व पत्ता	पेशी तारीख
१.	मा. जिल्हा न्यायाधीश –१७ तथा अति.सत्र न्यायाधीश, नागपुर.	१००/२०१९	कलम ४५२, ३६३, ३६६, ३७६ भा.दं.वि.	सुनिल बिहारीलाल तांडीया रा. केवलाडी खेडा, पारधी चे घराजवळ, शिवनी छिंदवाडा, मध्यप्रदेश.	०६.११.२०२६
२	मा. १८ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर.	३०४०२२९/ १९९९	कलम ३७९, ५११, ३४ भा. दं.वि.	१) नरेश नामदेवराव महाजन, वय ४२ वर्ष, रा. पांढराबोडी, पोलीस चौकी मागे, अंबाझरी, नागपूर २) विलास वासुदेव पौनिकर, वय ५२ वर्ष, रा. सुभाष नगर झोपडपट्टी, टेलिफोन एक्सचेंज मागे, अंबाझरी, नागपुर.	०७.११.२०२६

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.